


# दैनिक आकर्षण

संपादक : विजय सांगळे    सहसंपादक : तुकाराम कामठे




वर्ष ५ ▪ अंक १५७ ▪ शनिवार ७ मार्च २०२६ ▪ पाने ४ ▪ मूल्य ₹ २    https://epaper.dainkaakarshan.com    E-mail- dainikaakarshan@gmail.com    RNI NO. MAHMAR/2021/84322





अहिल्यानगरमध्ये मोठ्या उत्साहात शिवजयंती साजरी झाली.

## जामखेडला हॉटेलमध्ये गोळीबार करणारा सराईत आरोपी चिंग्या एलसीबीकडून ताब्यात



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जामखेड येथील हॉटेलमध्ये गोळीबार करणारा अक्षय उर्फ चिंग्या मोरे याला स्थानिक गुन्हे शाखा व जामखेड पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. चिंग्या हा रेकार्डवरील आरोपी असून, त्याच्यावर जामखेड पोलीस ठाण्यात दहा गुन्हे दाखल आहेत.

फिर्यादी रोहीत अनिल पवार (वय- २९ वर्षे, रा. कान्होपात्रानगर, जामखेड)हे दिनांक १८ डिसेंबर २०२५ रोजी न्यू कावेरी हॉटेल (जामखेड-बीड रोड) येथे असतांना आरोपी शुभम शहाराम लोखंडे, उल्हास विलास माने उर्फ वस्ताद, अक्षय उर्फ चिंग्या विश्वनाथ मोरे, अर्शद अमीन सय्यद व अनोळखी ६ ते ७ यांनी गैरकायद्याचे मंडळी जमवून फिर्यादीस जीवे मारण्याच्या उद्देशाने पिस्टलने फायर करुन गंभीर जखमी केले व हॉटेलमधील सामानाची तसेच फॉर्च्युनर चारचाकीची सत्तूर व लाकडी दांड्याने तोडफोड करुन नुकसान केले. याबाबत जामखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे.

गुन्ह्यातील मुख्य आरोपी अक्षय उर्फ चिंग्या विश्वनाथ मोरे हा गुन्हा घडल्यापासून फरारी होता. दिनांक ६ मार्च रोजी तो खर्डा परिसरात आला असल्याची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी प्रवीणचंद लोखंडे यांना मिळाली. त्यानुसार एसपींच्या आदेशाने स्थानिक गुन्हे शाखा व जामखेड पोलिसांच्या पथकाने आरोपीला खर्डा परिसरातून शिताफीने ताब्यात घेतले.

### पथकात यांचा सहभाग

**सदरची कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रवीणचंद लोखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी तसेच पथकातील सपोनि हरीश भोये, उपनिरीक्षक महादेव गुट्टे, समीर अभंग, पोलीस अंमलदार सुरेश माळी, फुरकान शेख, हृदय घोडके, अतुल लोटके, विष्णू भागवत, गणेश लोंढे, शाम जाधव, रिचर्ड गायकवाड, भाऊसाहेब काळे, अमोल कोतकर, योगेश कर्डिले, अमृत आढाव, प्रशांत राठोड, चालक अर्जुन बडे, भगवान धुळे तसेच जामखेडचे उपनिरीक्षक किशोर गावडे, पुष्कर कडु, पोलीस अंमलदार प्रवीण इंगळे, रवींद्र वाघ, देवीदास पळसे, कुलदीप घोळवे, दत्तात्रय बेल्हेकर, आकाश शेवाळे, प्रताप देवकाते, मनोज लातुरकर यांच्या पथकाने केली.**

## युद्धजन्य परिस्थितीत शांततेसाठी भारताने पुढाकार घ्यावा - अण्णा हजारे


**पंतप्रधान मोदींना पत्र लिहून संवाद साधण्याची व्यक्त केली अपेक्षा**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेले युद्ध व त्यामुळे जगात निर्माण झालेली युद्धजन्य परिस्थिती या पार्श्वभूमीवर ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना पत्र लिहून युद्धजन्य परिस्थितीत भारताने शांततेसाठी पुढाकार घेण्याची विनंती केली आहे.



युद्धाच्या पार्श्वभूमीवर जगातील वेगवेगळ्या देशात वाढत असलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर भारताने शांततेसाठी पुढाकार घ्यावा, अशी मागणी अण्णा हजारे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून केली आहे. जगभरात सुरू असलेल्या संघर्षांमुळे सामान्य नागरिक, महिला आणि मुलांवर गंभीर परिणाम होत असल्याची चिंता अण्णा हजारे यांनी व्यक्त केली आहे. भारताची संस्कृती अहिंसा ▪ **पान ४ वर**




### भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलच्या इको क्लबची पर्यावरणपूरक मोहीम

## पर्यावरण रक्षण हीच खरी देशसेवा – उल्हास दुगड

**विद्यार्थ्यांनी शहरात हजारो मीटर 'चायना नायलॉन मांजा' गोळा केला**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** मकर संक्रांतीनंतर पतंगोत्सवामुळे शहरातील झाडे, विद्युत तारा व रस्त्यांवर अडकून राहणारा 'चायना नायलॉन मांजा' पर्यावरणासाठी आणि पक्ष्यांसाठी घातक ठरत असल्याच्या पार्श्वभूमीवर भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलच्या इको क्लबच्या विद्यार्थ्यांनी पुढाकार घेत पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारी विशेष मोहीम राबवली. या मोहिमेद्वारे विद्यार्थ्यांनी शाळा परिसर तसेच आजूबाजूच्या भागातून तब्बल हजारो मीटर नायलॉन मांजा गोळा करून त्याची योग्य विल्हेवाट



लावण्याची व्यवस्था केली.

मकर संक्रांतीनंतर दरवर्षी पतंगोत्सवामुळे मोठ्या प्रमाणात नायलॉन मांजा झाडांवर, रस्त्यांवर आणि विद्युत तारा यांवर अडकून राहतो. हा मांजा पक्षी, प्राणी तसेच नागरिकांसाठी गंभीर धोका निर्माण करतो. अनेकदा पक्ष्यांचे पंख किंवा मान कापल्याच्या घटना घडतात, तर दुचाकीस्वारांनाही अपघाताचा धोका निर्माण होतो. या धोक्याची जाणीव ठेवून इको क्लबच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता मोहीम राबवत झाडांवर अडकलेला व रस्त्यांवर विखुरलेला नायलॉन मांजा काळजीपूर्वक काढून सुरक्षितपणे जमा केला.

विद्यार्थ्यांनी गोळा केलेला हा मांजा पर्यावरण अभ्यासक व 'निसर्ग मित्र' अमित गायकवाड यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. यानंतर या मांज्याची पर्यावरणपूरक पद्धतीने विल्हेवाट लावण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलचे इको क्लब प्रमुख तसेच अहिल्यानगर महानगरपालिकेचे पर्यावरण दूत सतिश गुगळे हे मागील सहा ते सात वर्षांपासून सातत्याने हा

## दै. आकर्षण निवडक

### डोंगरातील श्री गोरक्षनाथ मंदिर विद्युत रोषणाईने उजळले



अहिल्यानगर - तालुक्यातील आदर्श गाव मांजरसुंबा येथील डोंगरमाथ्यावर वसलेले श्री क्षेत्र गोरक्षनाथ मंदिर सध्या आकर्षक विद्युत रोषणाईने उजळून निघाले आहे. मंदिराच्या कलशरोहण सोहळ्यानिमित्त संपूर्ण गोरक्षनाथ गड परिसरात उत्साहाचे आणि भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून भाविकांची मोठी गर्दी होत आहे. डोंगरमाथ्यावर असलेल्या या पवित्र मंदिरावर करण्यात आलेली रंगीबेरंगी विद्युत रोषणाई रात्रीच्या वेळी अत्यंत मनमोहक आणि आकर्षक दिसत आहे. मंदिर परिसरातील रोषणाई, सजावट आणि धार्मिक वातावरण पाहण्यासाठी दररोज सायंकाळी अनेक भाविक गडावर येत आहेत. या सुंदर रोषणाईमुळे गोरक्षनाथ गडाचे सौंदर्य अधिक खुलून दिसत आहे. श्री क्षेत्र गोरक्षनाथ गड हे नाथसंप्रदायातील अत्यंत पवित्र आणि श्रद्धास्थान असलेले धार्मिक स्थान म्हणून ओळखले जाते. संतांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या भूमीवर राज्याच्या विविध भागातून नाथभक्त आणि वारकरी भाविक मोठ्या संख्येने देवदर्शनासाठी येत आहेत. मंदिराच्या कलशरोहण धार्मिक सोहळ्यामुळे भाविकांमध्ये विशेष उत्साह दिसून येत आहे. या निमित्ताने गड परिसरात विविध धार्मिक, अध्यात्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून भक्तांना अध्यात्मिक समाधानाचा अनुभव मिळत आहे.डोंगरमाथ्यावरून दिसणारी रोषणाई आणि मंदिराचे दिव्य स्वरूप पाहताना भाविकांना जणू काही स्वर्गीय वातावरणाचा अनुभव मिळत असल्याची भावना अनेक भक्तांनी व्यक्त केली. त्यामुळे दररोज सायंकाळी मोठ्या संख्येने भाविक गोरक्षनाथ गडावर येऊन दर्शन घेत आहेत.

### भारतीय जनता पार्टीच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी निवडीबद्दल विखे पाटील यांचा सत्कार



अहिल्यानगर- सत्यशोधक साहित्यरत्न डॉ. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे बहुउद्देशी सेवा फाउंडेशन च्या वतीने सुजय विखे पाटील यांची भारतीय जनता पार्टी (भाजप) महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला.सत्यशोधक साहित्यरत्न डॉक्टर लोकशाहीर अण्णाभाऊ साठे बहुउद्देशी सेवा फाउंडेशन, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात माजी खासदार सुजय विखे यांना पुष्पगुच्छ, शाल व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात त्यांनी केलेल्या कार्याची यावेळी उपस्थित मान्यवरांनी प्रशंसा केली.कार्यक्रमाला फाउंडेशनचे अध्यक्ष बाळासाहेब मोरे यांच्यासह अनिल गायकवाड, संदीप काकडे, नाना सुदेश गायकवाड, जयश्रीताई गायकवाड, ज्योतीताई साठे, नितीन खंडारे सर, निळकंठ उल्हारे मेजर आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी बोलताना फाउंडेशनचे अध्यक्ष बाळासाहेब मोरे म्हणाले की, सुजय विखे च्या पुढील राजकीय वाटचालीस शुभेच्छा देत त्यांच्या नेतृत्वातून महाराष्ट्रात पक्ष संघटन अधिक बळकट होईल, असा विश्वास व्यक्त केला.

# ‘ऋणानुबंध’चे राज्यस्तरीय पुरस्काराचे आज वितरण

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** नगरमध्ये डॉ.तात्याराव लहाने, आनंद भंडारी, सोमनाथ घार्गे, श्रीम. ज्योतीताई गाडे, यांच्या उपस्थितीत ऋणानुबंध बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे दरवर्षी दिले जाणारे ऋणानुबंध राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा येत्या शनिवारी म्हणजेच ७ मार्च २०२६ रोजी माऊली सभागृह, सावेडी, अहिल्यानगर येथे संध्याकाळी ४ ते ७ या वेळेत पार पडत आहे.

नेहमीच सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून समाजभिमुख कार्य करणारी ऋणानुबंध संस्था दरवर्षी वैशिष्ट्यपूर्ण आणि समाजाला प्रेरणा देणारे काम करणाऱ्या समाजातल्या विविध घटकांचा राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मान करत असते. सन २०२४-२५ चे पुरस्कार हे महिलांना समर्पित आहेत. राज्यभरातून वेगळे वैशिष्ट्यपूर्ण काम करणाऱ्या एकूण ८ महिलांचा सन्मान या कार्यक्रमात केला जाणार आहे.




प्रसिद्ध नेत्ररोग तज्ञ,पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्या नगर, आनंद भंडारी पोलिस अधीक्षक, अहिल्यानगर, सोमनाथ घार्गे, महापौर महानगरपालिका, अहिल्यानगर,सौ. ज्योतीताई गाडे, शिक्षण अधिकारी, प्राथमिक जिल्हा परिषद, अहिल्यानगर, भास्कर पाटील, मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी नितीन उदमले या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

ऋणानुबंध राज्यस्तरीय पुरस्कारार्थी मध्ये सुमनताई सोनवणे - यवतमाळ यांना सामाजिक क्षेत्रासाठी, मंजुषा काळे यांना आदिवासी शिक्षण, मंदा फलके यांना शिक्षण, निमलमाई दिवेकर - दौंड यांना कृषी, डॉ. तेजस्विनी मिस्कीन यांना मानसिक आरोग्य, डॉ. गौरी कुलकर्णी यांना आरोग्य, दैवशाला गुळवे यांना गृहउद्योग तर रजनी बोर्डे यांना आरोग्य क्षेत्रातील योगदानाबद्दल सन्मानित करण्यात येणार आहे.

विविध क्षेत्रातील महिलांचा महिला दिनाच्या पूर्वसंध्येला सन्मान करण्यात येणार असल्याने महिला वर्गामध्ये समाधानाचे वातावरण आहे. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला ऋणानुबंध चे कलाकार मराठी, हिंदी गीते सादर करणार आहेत. या कलाकारांमध्ये अजय आदमाने, डॉ. खंडागळे, महेश घावटे, बाबासाहेब जगताप, विजय मोरे, प्रक्षेप सोमवंशी, प्राची लाटे, प्रेक्षा सोमवंशी, प्रतिभा साबळे, डॉ.झेंडे, आंबेकर, जीवन महाजन, स्वाती कुमठेकर, मोनाली, सीमा रघुवंशी हे गीते सादर करणार आहेत.

या कार्यक्रमाची प्रवेशिका प्रवेशद्वारावर उपलब्ध असणार आहे. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सचिन परदेशी, भानुदास महानुर, डॉ. सुद्रीक, ऋणानुबंधचे सचिव प्रशांत बंडगर, उपाध्यक्षा सारिका रघुवंशी हे परिश्रम घेत आहेत.

या कार्यक्रमामध्ये पाहुण्यांचे मार्गदर्शन आणि संगीत अशी दुहेरी मेजवानी मिळणार असल्याने नगरकरांनी त्याचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन अध्यक्ष अजित रोकडे यांनी केले आहे.

# विद्यार्थ्यांनी आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करावे – प्रमोद वैद्य



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** विद्यार्थ्यांनी आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करून यशस्वी व्हावे, असे प्रतिपादन कमिन्स इंडिया प्रा. लि. चे डायरेक्टर आणि बिझनेस लीडर प्रमोद वैद्य यांनी केले.

नवजीवन प्रतिष्ठान समन्वयीत आणि कमिन्स इंडिया फाउंडेशन अर्थसहाय्यित मॉडेल व्हिलेज प्रकल्प ससेवाडी अंतर्गत जिल्हा परिषद शाळेतील विविध विकास कामांच्या लोकार्पण सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात आपल्या अध्यक्षीय भाषणात दळवी बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, प्राथमिक शिक्षण हे माणसाच्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा असून पाया मजबूत असला तरच विद्यार्थ्याला उंच शिखरावर जाता येते. विद्यार्थ्यांनी शालेय शिक्षणाबरोबरच आपल्या अवतीभोवती घडत असलेल्या सर्व घटनांचे बारकाईने निरीक्षण करावे. व काळाबरोबर स्वतःला सिद्ध करावे.

कमिन्सच्या वतीने शाळेमध्ये १ वर्गखोली, १ डायनिंग कम बहुउद्देशीय हॉल, हॅण्ड वॉश स्टेशन, विद्यार्थी व विद्यार्थिनीसाठी स्वतंत्र स्वच्छता गृह, मुलांना खेळण्यासाठी मैदान, पिण्याच्या पाण्यासाठी विद्युत मोटार व पाईपलाईन, शालेय शिक्षणासाठी इंट्रॅक्टिव्ह बोर्ड, व संपूर्ण शाळेला थीम पेंटिंग इत्यादी कामे करण्यात आली. तसेच शेतीच्या पाण्यासाठी खंडोबा दरा तलाव खोलीकरण व सांडवा बांधकाम करणे, सीना शंकर तलाव खोलीकरण व भराव मजबूत करणे, नागझरी तलाव खोलीकरण व पाणी पुनर्भरण करणे, सीना शंकर मंदिर परिसरात वृक्षारोपण करणे, मगरवस्ती येथे रस्त्याच्या दुतर्फा लावलेल्या झाडांच्या पाण्यासाठी पाण्याची टाकी बांधणे, डोंगर उतारावर जल शोषक चर खोदणे, उपजीविका विकास कार्यक्रमांतर्गत बचत गटातील महिलांसाठी शेळी पालन प्रकल्प, सेंद्रिय शेतीसाठी माती परीक्षण करणे, गांडूळ खत निर्मिती करणे, मधमाशी पालन प्रकल्प इत्यादी विकास कामे झालेली आहेत.

या लोकार्पण कार्यक्रमाप्रसंगी कमिन्स इंडियाचे एक्झिक्यूटिव्ह मॅनेजर विकास साळवे, प्रोजेक्ट मॅनेजर हितिका राज, ॲडमिन मॅनेजर सतीश फरताळे, नवजीवनचे राजेंद्र पवार, दिपक बत्तीसे, सुदीप पडवळ, सेंद्रिय शेती मित्र धोंडीभाऊ जरे, ऋषिकेश राऊत तसेच शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष संजय ससे, डॉ. राजेंद्र ससे, सावित्रभाऊ ससे, रोहिदास ससे, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विद्यार्थी-पालकांनी साकारली आकर्षक भित्तीचित्रे!

**कलारंग अकादमीच्या पुढाकारातून ग्रीन स्पार्क स्कूलमध्ये ‘तारे जमीन पर’ स्पर्धा**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** धुलीवंदनचे औचित्य साधत कलारंग ड्रॉइंग अकादमी व ग्रीन स्पार्क प्री स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने ‘तारे जमीन पर’ ही वॉल पेंटिंग स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्यात विद्यार्थी-पालकांच्या सुप्त गुणांतून सुंदर चित्रे साकारली.

कलारंग ड्रॉइंग अकादमीच्या संस्थापिका व प्रसिद्ध कलाकार सुजाता पायमोडे यांच्या मार्गदर्शनातून मुलांनी व पालकांनी सुबक चित्रे काढत रंगांशी मैत्री केली. या स्पर्धेच्या निमित्ताने अनेक पालकांनी त्यांच्या शालेय जीवनानंतर पहिल्यांदा रंग व ब्रश हाताळले. ‘चित्रकार सुजाता पायमोडे यांच्यामुळेच आम्हाला पुन्हा बालपणात जाता आले’, अशी उत्स्फूर्त प्रतिक्रिया या वेळी पालकांनी दिली.

या वेळी चित्रकार सुजाता पायमोडे म्हणाल्या की, कला माणसाला ध्यानस्थ करते. तुम्ही कलेच्या, रंगांच्या जवळ या. चुकले तरी चालेल, त्या चुकीतूनही दुसरे चांगले चित्र निर्माण करता येईल. प्री स्कूलच्या मुलांना सलग चार-पाच तास एका उपक्रमात रमवून ठेवणे सोपे नसते. परंतु ग्रीन स्पार्कच्या संचालिका हेमलता पाटील या नेहमीच मुलांसाठी कृतिशील उपक्रम राबवत असतात. शाळा हे मुलांचे दुसरे घर असते. विद्यार्थ्यांच्या शिक्षण प्रक्रियेत पालकांचा सहभाग अधिकाधिक वाढवणे व यांत्रिकपणा कमी करणे, शाळेशी पालक-मुलांचे भावनिक नाते घट्ट करणे, कृतीतून शिक्षण याकडे पाटील यांचे विशेष लक्ष असते. शाळेच्या भिंतींवर विद्यार्थी-पालकांनी अत्यंत सुंदर चित्रे काढून सर्वांनाच आचंबित केले. स्पर्धेच्या निमित्ताने मिळालेल्या संधीचा पुरेपूर फायदा पालकांनी घेतला. त्यातून चांगल्या कलाकृती साकारल्या.

स्पर्धेचे कामकाज सहशिक्षिका विद्या तोंडे व वैशाली वायभासे यांनी पाहिले. तसेच अर्चना ताटी व तनिष्का शेलार या कलाकारांनाही मोलाचे सहकार्य केले. स्पर्धेत प्रथम क्रमांक केशवी व वडील सचिन पवार,द्वितीय नमस्या व आई अंजली ढाकणे, तर तृतीय क्रमांक देवंश व दिव्या गाडळकर यांनी पटकावला.

# नाशिकचा एसीपीनेच बोगस कागदपत्रांच्या आधारे ‘मिटकवली’ नोकरी

**कायद्याचा रक्षकच निघाला भक्षक आणि बोगस आदिवासी : आदिवासी विकास परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष लकीभाऊ जाधव यांनी केला संदीप मिटकेचा पर्दाफाश**

**नाशिक –** नाशिक शहर पोलीस आयुक्तालयातील सहाय्यक पोलीस आयुक्त संदीप बाबुराव मिटके याने खोट्या कागदपत्रांच्या आधारे नामसाधर्म्याचा फायदा घेऊन मन्नेवारलू आदिवासी जमातीचे जातवैधता प्रमाणपत्र मिळवल्याचे स्पष्ट झाले आहे. म्हणून २०१५ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत सहाय्यक पोलीस आयुक्त या आदिवासी राखीव पदावरील त्याची निवड पूर्वलक्षी प्रभावाने रद्द करावी, त्याच्यावर फौजदारी गुन्हा, ॲट्रॉसिटी दाखल करून दिलेले वेतनादी लाभ तात्काळ वसुल करावेत अशी मागणी अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेचे राष्ट्रीय युवा अध्यक्ष लकीभाऊ जाधव यांनी केली आहे. सहआयुक्त तथा उपाध्यक्ष अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती छत्रपती संभाजीनगर हे याप्रकरणी २४ मार्चला अंतिम सुनावणी घेणार आहेत. संदीप मिटके यांच्या कुटुंबातील ६ जणांचे अनुसूचित जमातीचे जातप्रमाणपत्र यापूर्वी अवैध ठरवून जप्त करण्यात आलेले आहे. पोलीस दक्षता पथकाने प्रस्तुत प्रकरणी कसून चौकशी केली असून मिटके यांचे जातवैधता प्रमाणपत्र जप्त करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली आहे. लकीभाऊ जाधव यांनी कायद्याचा रक्षकच आदिवासीचा भक्षक बनून खऱ्या आदिवासी लोकांच्या उरावर बसत असल्याने छत्रपती संभाजीनगर समितीकडे तक्रार केली होती. दरम्यान ह्या प्रकरणामुळे नाशिक शहर पोलिसांची अब्रू वेशीवर टांगली गेली आहे. सामान्य आदिवासी जनतेच्या राखीव जागेवर बोगस आदिवासी म्हणून बसलेल्या संदीप मिटकेवर काय कठोर कारवाई होते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

आदिवासी विकास परिषदेचे राष्ट्रीय युवा अध्यक्ष लकीभाऊ जाधव यांनी याबाबत अधिक माहिती दिली. संदीप बाबुराव मिटके यांने नामसाधर्म्याचा फायदा घेऊन उपविभागीय अधिकारी औरंगाबाद यांच्याकडून १८ डिसेंबर २००१ ला मन्नेरवारलू या आदिवासी जमातीचे प्रमाणपत्र क्र. १५२ घेतले. छत्रपती संभाजीनगरच्या अनुसूचित जमाती प्रमाणपत्र समितीची दिशाभूल करून बनावट कागदपत्राच्या आधार घेतला. संबंधित पोलीस दक्षता पथकाशी मोठी आर्थिक देवघेव आणि हातमिळवणी करून ९ जून २००५ ला मन्नेवारलू आदिवासी जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र क्र. २५३०९२ मिळवलेले आहे. त्याच्या कुटुंबातील ६ रक्त नात्यातील व्यक्तींचे जात वैधता प्रमाणपत्र मिळवण्याचे दावे समितीने यापूर्वीच अवैध घोषित केलेले आहेत. खऱ्या आदिवासीच्या राखीव जागेवर संदीप मिटके याने घुसखोरी केलेली आहे. सामान्य आदिवासी, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, महाराष्ट्र शासन, आदिवासी प्रमाणपत्र तपासणी समिती आणि नाशिक शहर पोलीस आयुक्त या सर्वांची त्याने जाणीवपूर्वक फसवणूक केलेली असल्याने त्याची योग्य त्या पुराव्यासह तक्रार केली आहे. छ. संभाजीनगर समितीने याबाबत गांभीर्याने दखल घेतली आहे. संबंधिताला वारंवार खुलासा करण्याची संधी देऊनही त्याने अद्याप काहीही खुलासा केलेला नाही. एखाद्या व्यक्तीने समितीकडून गैरमार्गाने, लबाडीने, वस्तुस्थिती लपवून, खोट्या कागदपत्रांच्या आधारे अथवा खोटी माहिती सादर करुन जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त केल्याची बाब आढळून आल्यास संबंधित व्यक्तीस आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर विहीत केलेली कार्यपध्दती अनुसरून आदेशांद्वारे असे प्रमाणपत्र रद्द करण्याचे अंतर्निहीत () अधिकार समितीस असल्याचे निरीक्षण उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे रिट याचिका क्र. १९५४/२००९ (ज्योती शेषराव मुपडे विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर) आणि रिट याचिका क्र.५१६०/२०१२ (राजेश्वर बाबुराव बोने विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर) प्रकरणी नोंदविलेले आहे. म्हणून २४ मार्चला होणाऱ्या सुनावणीत संदीप मिटकेचे वैधता प्रमाणपत्र जप्त केले जाणार असल्याचे लकीभाऊ जाधव यांनी शेवटी सांगितले.

# केडगावातील जे.एस.एस. गुरुकुलमध्ये विद्यार्थ्यांची दंत तपासणी

**इंडियन डेंटल असोसिएशन, अहिल्यानगर शाखेचा उपक्रम; दातांच्या आरोग्याविषयी जागृती**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** केडगाव येथील जैनाचार्य श्री शिवमुनीजी गुरुकुल (जे. एस.एस.) स्कूलमध्ये इंडियन डेंटल असोसिएशन अहिल्यानगर शाखेच्या वतीने शाळेतील सर्व विद्यार्थ्यांची मोफत दंत तपासणी करण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांना मौखिक आरोग्य, दंत स्वच्छता आणि योग्य सवयींबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

हा उपक्रम कम्युनिटी डेंटल हेल्थ अंतर्गत राबविण्यात आला. डेंटल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. ओंकार भालसिंग आणि सचिव डॉ. शिल्पा इनमुलवार यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर उत्साहात पार पडले. शिबिरात सहभागी डॉक्टरांनी विद्यार्थ्यांची सखोल तपासणी करून दातांवरील कीड, हिरड्यांच्या समस्या आणि स्वच्छतेची स्थिती यांची पाहणी केली. यावेळी विद्यार्थ्यांना योग्य पद्धतीने ब्रश कसा करावा, फ्लॉसिंगचे महत्त्व, तसेच संतुलित आहाराचे फायदे याबाबत माहिती देण्यात आली.

विशेष म्हणजे ‘ट्रॅफिक सिग्नल’च्या उदाहरणाद्वारे दातांची कीड आणि स्वमूल्यांकन ही संकल्पना अतिशय सोप्या आणि प्रभावी पद्धतीने समजावून सांगण्यात आली. हिरवा रंग निरोगी दात, पिवळा रंग काळजी घ्या आणि लाल रंग तातडीने उपचार घ्या, अशा पद्धतीने विद्यार्थ्यांना स्वतः च्या दातांचे निरीक्षण करण्याचा संदेश देण्यात आला. याप्रसंगी दातांची कीड टाळण्यासाठी आणि नियमित



तपासणीसाठी मार्गदर्शक सूचना असलेले भिंतपत्रकाचे अनावरण करण्यात आले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्राचार्या निकिता कटारिया यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. प्रास्ताविकात प्राचार्य आनंद कटारिया म्हणाले की, जैनाचार्य श्री शिवमुनीजी गुरुकुल स्कूलमध्ये विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबत संस्कारांचे धडे दिले जातात. आदर्श व्यक्तिमत्त्व असलेली पिढी घडविण्याचा आमचा उद्देश आहे. विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाबरोबरच शारीरिक आणि मानसिक आरोग्यालाही तितकेच महत्त्व दिले जाते. त्यांच्या आहार, व्यायाम आणि स्वच्छतेबाबत विशेष काळजी घेतली जाते. विद्यार्थ्यांच्या आरोग्यदृष्टीने हे दंत तपासणी शिबिर अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

डॉ. ओंकार भालसिंग म्हणाले की, लहान वयातच दातांची योग्य काळजी घेतली तर भविष्यातील गंभीर समस्या टाळता येतात. अनेक वेळा लहान मुलांमध्ये साखरयुक्त पदार्थांचे अतिसेवन आणि योग्य ब्रशिंग न केल्यामुळे दातांची कीड वाढते. त्यामुळे शालेय स्तरावर अशा शिबिरांच्या माध्यमातून जागृती करणे अत्यंत आवश्यक असल्याचे सांगितले.

डॉ. शिल्पा इनमुलवार यांनी सांगितले की, कम्युनिटी डेंटल हेल्थ उपक्रमांतर्गत ग्रामीण व शहरी भागातील शाळांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांची तपासणी करणे आणि त्यांना योग्य मार्गदर्शन करणे हे आमचे ध्येय आहे. दातांचे आरोग्य चांगले असेल तर एकूण आरोग्यही चांगले राहत असल्याचे सांगितले.

या शिबिरात डॉ. प्रिया भालसिंग, डॉ. प्राजक्ता झावरे, डॉ. स्वाती कुलंगे आणि डॉ. प्रांजल गायकर यांनी सक्रिय सहभाग घेत विद्यार्थ्यांची तपासणी व मार्गदर्शन केले. या शिबिरात विद्यार्थ्यांना दिवसातून किमान दोन वेळा ब्रश करा, साखरयुक्त पदार्थांचे सेवन कमी करा, गुटखा, तंबाखू यांसारख्या घातक पदार्थांपासून दूर राहा, आरशात नियमितपणे दात तपासा; डाग किंवा खड्डे दिसल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्या, दर सहा महिन्यांनी दंत तपासणी करून घेण्याचे आवाहन करण्यात आले.

**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### रांजनगाव दांडगा शिवारात पोकलँड ऑपरेटरची गळफास घेऊन आत्महत्या



पैठण - ढोरकीन लिंबगाव रस्त्याचे काम करणाऱ्या ठेकेदाराकडे काम करणाऱ्या मध्यप्रदेश येथील पोकलँड ऑपरेटरने रांजनगाव दांडगा शिवारात झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. ही घटना गुरुवारी मध्यरात्रीच्या सुमारास घडल्याची माहिती मिळाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ढोरकीन लिंबगाव या रस्त्याचे काम सध्या सुरू असून संबंधित ठेकेदाराकडे मध्यप्रदेशमधील काही कामगार काम करत होते. त्यापैकी एक पोकलँड मशीन ऑपरेटर रात्रीच्या वेळी रांजनगाव दांडगा शिवारात गेला व त्याने झाडाला गळफास लावून आत्महत्या केली. सकाळी स्थानिक नागरिकांच्या निदर्शनास ही घटना आल्यानंतर परिसरात खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. आत्महत्येचे नेमके कारण अद्याप समजू शकले नसून पोलीस पुढील तपास करत आहेत. या घटनेमुळे रस्ते कामगारांमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे.

### शिवजयंतीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराजांना भालसिंग यांच्याकडून अभिवादन




अहिल्यानगर- छत्रपती शिवाजी महाराज यांच्या तिथीनुसार साजऱ्या करण्यात येणाऱ्या शिवजयंतीनिमित्त सामाजिक कार्यकर्ते विजय भालसिंग यांनी शहरातील जुने बसस्थानक परिसरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी सागर कपिले उपस्थित होते. यावेळी बोलताना विजय भालसिंग म्हणाले की, हिंदवी स्वराज्याचे संस्थापक आणि लोककल्याणकारी राज्यकारभाराचे आदर्श निर्माण करणारे छत्रपती शिवाजी महाराज यांचे कार्य आजही समाजाला प्रेरणा व दिशा देणारे आहे. स्वराज्य, स्वाभिमान आणि न्याय या मूल्यांवर आधारित राज्यकारभाराची संकल्पना त्यांनी प्रत्यक्षात साकारली. त्यामुळेच शिवरायांचे व्यक्तिमत्त्व केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित न राहता संपूर्ण देशासाठी प्रेरणास्थान ठरले आहे. शिवाजी महाराजांनी अवघ्या पंधराव्या वर्षी रामेश्वराच्या मंदिरात आपल्या मावळ्यांसमवेत हिंदवी स्वराज्य स्थापनेची शपथ घेतली. त्या काळात देशात सर्वत्र परकीय सत्तांचे राज्य होते. अशा परिस्थितीत स्वराज्याची निर्मिती करणे हे अत्यंत कठीण आणि अशक्यप्राय कार्य होते. समोर निजामशाही, आदिलशाही आणि मुघल बादशाही असे बलाढ्य शत्रू असतानाही शिवरायांनी आपल्या शौर्य, धैर्य आणि बुद्धिमत्तेच्या बळावर स्वराज्याचा पाया मजबूत केला. या स्वराज्य स्थापनेच्या लढ्यात बाजीप्रभू देशपांडे, तानाजी मालुसरे, मुरारबाजी देशपांडे यांसारख्या शूरवीर मावळ्यांनी आपल्या राजांना खंबीर साथ दिली. या वीरांच्या पराक्रमामुळेच स्वराज्याचा विस्तार शक्य झाला आणि इतिहासात हिंदवी स्वराज्याची सुवर्णपाने लिहिली गेली. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या राज्यकारभारात स्वराज्य, स्वाभिमान, न्याय आणि लोकहित यांना सर्वोच्च स्थान दिले. सामान्य जनतेला सुरक्षित आणि सन्मानाने जीवन जगता यावे यासाठी त्यांनी प्रभावी प्रशासन व्यवस्था उभी केली. धर्मनिरपेक्षता, स्त्री सन्मान, शिस्तबद्ध प्रशासन आणि मजबूत संरक्षणव्यवस्था या तत्त्वांवर त्यांनी आदर्श राज्यकारभार उभा केल्याचे त्यांनी सांगितले.

## 'सहाय्यक पोलीस निरीक्षक एस. एस. पाटील यांना अजामीनपात्र वॉरंट'

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नेवासा पोलीस स्टेशनचे तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक श्री एस. एस. पाटील( सध्या मेढा पोलीस स्टेशन तालुका जावळी जिल्हा सातारा येथे कार्यरत असलेले) हे सुनावणी कामी गैरहजर राहिल्याने नेवासा येथील जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री आर आर हास्तेकर यांनी अजामीन पात्र वॉरंट (नॉन बेलेबल वॉरंट) काढले आहे.

याबाबतची माहिती अशी की मौजे सुरेगाव दही तालुका नेवासा जिल्हा अहिल्यानगर येथे दिनांक २८/१२/२०१६ रोजी सकाळी साडेदहा वाजता परसराम जनार्दन गंणगे वगैरे २३ व्यक्तींनी फिर्यादी गोरक्षनाथ गणगे वगैरे १० व्यक्तींना जमिनीच्या वादातून गंभीर मारहाण करून जखमी करून त्यात मच्छिंद्र बाजीराव गंणगे यांचा मृत्यू झाल्याने वर नमूद व्यक्तींविरुद्ध भादवि कलम भाग ३०२,३०७,३२६,५०४,५०६,१४३,१४७,१४८ व १४९ नुसार नेवासा पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास पूर्ण करून आरोपपत्र नेवासा येथील न्यायालयात दाखल केले होते तद्नंतर त्याची सुनावणी सत्र न्यायालय नेवासा येथे सुरू झालेली होती.

परंतु सुनावणी कामी नेवासा पोलीस स्टेशनचे तत्कालीन तपासी अधिकारी पीएसआय एस. एस. पाटील( सध्या सहाय्यक पोलीस निरीक्षक मेढा पोलीस स्टेशन तालुका जावळी जिल्हा सातारा) हे अनेक वेळा गैरहजर राहिले ही बाब जिल्ह्याचे विशेष सरकारी वकील ॲड.सुरेश लगड यांनी सत्र न्यायालय नेवासा यांचे निदर्शनास आणून दिल्याने सत्र न्यायालयाने तपासी अधिकारी एस. एस. पाटील सहायक पोलीस निरीक्षक मेढा पोलीस स्टेशन. ता.जावळी जिल्हा सातारा यांचे विरुद्ध अजामीनपात्र वॉरंट (नॉन बेलेबल वॉरंट) काढले असून पुढील सुनावणी २३मार्च २०२६ रोजी ठेवली आहे या प्रकरणात विशेष सरकारी वकील ॲड. सुरेश लगड हे सरकार पक्षातर्फे काम पाहत आहेतर आरोपीतर्फे ॲड. जी.आर काकडे वकील हे काम पाहत आहे.

## श्री क्षेत्र चोंडी विकास आराखडा हा सर्व दृष्टीने परिपूर्ण असावा

**महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली महत्वपूर्ण बैठक**



**मुंबई । वृत्तसंस्था**

– श्री क्षेत्र चोंडी विकास आराखडा हा सर्व दृष्टीने परिपूर्ण असावा. त्याचप्रमाणे पर्यावरणस्नेही पर्यटन (इको टूरिझम) यादृष्टीने देखील त्यामध्ये सुधारणा आणि विस्तार करण्यात यावा. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे हे जन्मस्थान असल्याने एकावेळी किमान ५० ते ७० हजार भाविकांची यात्रेनिमित्त सोय होऊ शकेल यादृष्टीने नियोजन असावे, अशा सूचना महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांनी दिल्या. आज दिनांक ०५ मार्च, २०२६ रोजी त्यांच्या अध्यक्षतेखाली सार्वजनिक बांधकाम विभाग आणि वनविभाग यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची महत्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली, त्याप्रसंगी ते बोलत होते.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मस्थळाचे सुशोभीकरण योग्यप्रकारे करण्यात यावे. पर्यावरणस्नेही पर्यटन (इको टूरिझम) यादृष्टीने नियोजित आराखड्यामध्ये काही बदल करायचे असतील तर ते करण्यात यावेत. पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांनी संदेश दिलेल्या जलसंवर्धन, वृक्षसंवर्धन संकल्पनांची जपणूक, चोंडी येथे देशभरातून येणाऱ्या पर्यटकांसाठी सुव्यवस्थित रस्ते, संग्रहालय, महादेव मंदिर आणि चौंडीश्वरी मंदिर जीर्णोध्दार, निवास व्यवस्था, सुसज्ज वाहनतळ, स्थानिक उत्पादने, खाद्यपदार्थ यांची बाजारपेठ या सोयीसुविधांना प्राधान्य देण्यात यावे, असे महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांनी स्पष्ट केले.

## महिला स्वच्छतागृहाबाबत चांदगुडे यांनी दिले डॉ. नीलम गोऱ्हे यांना निवेदन

**चार दिवसातच कार्यवाही**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** बस स्थानकातील स्वच्छता गृहात महिलांची कुचंबणा होते.महाराष्ट्रातील सर्व बस स्थानकातील स्वच्छगृहे स्वच्छ व मोफत उपलब्ध व्हावीत, यासाठी प्रयत्न करावा. असे निवेदन सामाजिक कार्यकर्ते कृष्णा चांदगुडे यांनी विधान परिषदेच्या उप सभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांना निवेदन दिले होते. चार दिवसांत त्यावर कार्यवाही झाली आहे . राजकीय व्यक्ती संवेदनशील असेल तर सर्वसामन्यांची कामे किती लवकर होतात, याचा प्रत्यय यानिमित्ताने आला आहे.

अधिक माहिती अशी की , मराठी विश्व साहित्य संमेलनासाठी डॉ. नीलम गोऱ्हे या दिनांक १ मार्च रोजी नाशिकला आल्या होत्या. कृष्णा चांदगुडे यांनी त्यांची शासकीय विश्राम गृहावर भेट घेतली. चांदगुडे हे महिलांच्या प्रश्नावर काम करत असतांना बस स्थानकावरील स्वच्छता गृहाचा मुद्दा त्यांच्या लक्षात आला होता. म्हणून त्यांनी डॉ. नीलम गोऱ्हे यांना तसे निवेदन दिले होते. आपल्या दैनिकाने बातमी देवून यास प्रसिद्धी दिली होती.महाराष्ट्रातील बस स्थानकातील महिलांची कुचंबणा होत आहे . ती सर्व स्वच्छगृहे स्वच्छ व मोफत उपलब्ध व्हावीत, यासाठी प्रयत्न करावा. असे निवेदनात म्हटले होते. ही बाब छोटी वाटत असली तरी महिलांसाठी डोंगराएवढी आहे.डॉ. नीलम गोऱ्हे यांनी हा महिलांसाठी खूप महत्त्वाचा मुद्दा असल्याने लवकरच चर्चेसाठी घेणार असल्याचे म्हटले होते.

डॉ. नीलम गोऱ्हे यांनी हा व इतर मुद्दे लावून धरले.दि. ०४ मार्च रोजी मंत्रालयात यांच्या अध्यक्षतेखाली विधानभवनात महिला सुरक्षिततेवर उच्चस्तरीय बैठक झाली. अनेक सुविधा अस्तित्वात असूनही त्यांची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचे त्यांनी निदर्शनात आणून दिल्या.बैठकीच्या शेवटी प्रत्येक बसस्थानकावर महिला कर्मचाऱ्यांची नेमणूक करून स्वतंत्र मदत केंद्र सुरू करण्याचे, रेल्वे व एसटीसाठी स्वतंत्र दक्षता समित्या स्थापन करण्याचे आणि स्वच्छतागृह व 'हिरकणी कक्ष' यांची नियमित तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले. डॉ. नीलम गोऱ्हे यांनी महिलांच्या अनेक समस्यांवर ठोस कार्यवाही केल्याने चांदगुडे यांनी समाधान व्यक्त केली आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त शिवसेना माळीवाडा शाखेकडून अभिवादन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शिवसेना माळीवाडा शाखेच्या वतीने त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी शिवसेना शहरप्रमुख संभाजी कदम, नगरसेवक बाळासाहेब बोराटे, दत्तात्रय कावरे, विक्रम राठोड, सुरेखा कदम, मंगल लोखंडे, नवनाथ कातोरे, संतोष गेनप्पा, सचिन शिंदे, संग्राम कोतकर, अरुण झेंडे, आण्णा घोलप, शिवाजी कदम, सुरेश तिवारी, विष्णुपंत म्हस्के, बंटी खैरे, शिवा जाधव, बजरंग भुतारे, सलोनी शिंदे, मनिषा घोलप आदी उपस्थित होते. यावेळी शिवसैनिकांनी घोषणाबाजी करत छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी शिवसेना पदाधिकार्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून त्यांना विनम्र अभिवादन केले. उपस्थितांनी महाराजांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या पराक्रमाच्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी परिसरात देशभक्तीपर घोषणांनी वातावरण भारावून गेले होते. शिवसैनिकांसह विविध सामाजिक कार्यकर्तेआणि नागरिकांनीही कार्यक्रमात सहभागी होत महाराजांना अभिवादन केले.

यावेळी बोलताना शहरप्रमुख संभाजी कदम म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना करून समाजातील सर्व घटकांना न्याय देणारे राज्य उभारले. त्यांच्या कार्यातून शौर्य, दूरदृष्टी आणि संघटनशक्ती यांचा आदर्श आजही समाजाला मार्गदर्शन करत आहे. तरुण पिढीने महाराजांच्या विचारांचे अनुकरण करून समाजहिताचे कार्य करणे हीच खरी त्यांना मानवंदना ठरेल, असेही त्यांनी सांगितले.

कदम पुढे म्हणाले की, शिवाजी महाराजांनी रयतेच्या हितासाठी केलेले कार्य आणि स्वाभिमानाचा दिलेला संदेश आजच्या काळात अधिक महत्त्वाचा आहे. समाजात ऐक्य, धैर्य आणि देशभक्तीची भावना निर्माण करण्यासाठी महाराजांचे विचार प्रत्येक घरापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. शिवसेना पक्षाच्या माध्यमातून शिवाजी महाराजांच्या आदर्शांवर चालत समाजहिताचे उपक्रम सातत्याने राबवले जातील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमास शिवसेना माळीवाडा शाखेचे पदाधिकारी, कार्यकर्तेतसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत उत्साहात पार पडले असून उपस्थितांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयघोषात त्यांना अभिवादन केले.

## छत्रपती शिवरायांचे विचार येणाऱ्या पीढीत रुजले पाहिजे – प्रा. प्रसाद जमदाडे



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** ज्ञानसाधना एज्युकेशन फाउंडेशन संचलित लंडन किड्स प्री स्कूलच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांची तिथीनुसार जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. शालेय विद्यार्थ्यांनी काढलेल्या मिरवणुकीने संपूर्ण परिसर शिवमय झाला होता. हातात भगवे ध्वज तसेच शिवकालीन वेशभूषा परिधान करून विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवला.

मिरवणुकीतील शिवाजी महाराजांची पालखी आणि तब्बल १०१ विद्यार्थ्यांनी साकारलेल्या शिवकालीन वेशभूषेने सर्वांचे लक्ष वेधले. विद्यार्थी छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊ छत्रपती संभाजी महाराज, महाराणी ताराबाई, लक्ष्मीबाई, संत तुकाराम या महापुरुषांच्या वेशभूषेत मिरवणुकीत सहभागी झाले होते.

प्रसाद जमदाडे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा पोवाडा म्हणत कार्यक्रमाची सुरुवात केली. ते म्हणाले की, आज तिथी नुसार शिवाजी महाराज यांची जयंती शाळेत साजरी करताना आनंद होत आहे. शिवाजी महाराजांचा स्वराज्य निर्माणाचा लढा भावी पिढीसाठी प्रेरणादायी आहे. शिवरायांचे विचार फक्त फोटो लावून किंवा घोषणा देऊन रुजत नाही. छत्रपतीचे विचार येणाऱ्या पीढीमध्ये त्यांच्या संस्कारातून रुजविले गेले पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

शिवाजी महाराजांच्या मूर्तीचे पूजन करून मिरवणुकीला सुरुवात झाली. शाळेपासून ओंकार नगर ते शाहूनगर बस स्टॉप व नंतर पुन्हा शाळेत असा मिरवणूक मार्ग होता. मिरवणुकीत विद्यार्थ्यांसह संस्थेचे सचिव संदीप भोर, ज्ञानसाधना गुरुकुलचे संचालक प्रसाद जमदाडे, शाळेच्या प्राचार्य रुचिता जमदाडे, कल्याणी शिंदे, सपना साबळे, जयश्री साठे, प्रतीक्षा शिंदे, जयश्री जठार, पूर्वा ढोरसकर, नक्षत्रा ढोरसकर, गोंदके मावशी, वालेकर मावशी, विठ्ठल नगरे, मनोज खांदवे सहभागी झाले होते. मिरवणूक पाहण्यासाठी पालक व नागरिकांनी गर्दी केली होती. ठिकठिकाणी मिरवणुकीचे स्वागत करण्यात आले.

## नाथषष्ठी पार्श्वभूमीवर पोलीस निरीक्षक महादेव गोमारे यांची पाहणी



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** नाथषष्ठी उत्सवासाठी पैठण शहरात मोठ्या प्रमाणावर भाविकांची गर्दी होणार असल्याने कोणत्याही भाविकांची गैरसोय होऊ नये, यासाठी पोलीस प्रशासन सतर्क झाले आहे. याच पार्श्वभूमीवर पोलीस निरीक्षक महादेव गोमारे यांनी गुरुवारी शहरातील प्रमुख ठिकाणांची पाहणी केली.

उत्सव काळात येणाऱ्या भाविकांना कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, वाहतूक सुरळीत राहावी तसेच पार्किंग व सुरक्षेची व्यवस्था योग्य राहावी यासाठी त्यांनी संबंधित पोलीस कर्मचाऱ्यांना सूचना दिल्या. यावेळी शहरातील प्रमुख रस्ते, चौक तसेच गर्दीच्या ठिकाणी बंदोबस्ताबाबतही त्यांनी आढावा घेतला. नाथषष्ठी उत्सव काळात भाविकांनी शिस्त पाळून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहनही पोलिसांकडून करण्यात आले आहे.

## निवृत्त पोलिसाने वकिलाला धमकावले गुन्हा दाखल

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पारनेर–** फिर्यादिचे वकिलपत्र घेतल्याच्या रागातुन जवळे, तालुका पारनेर येथील रामदास मारूती सालके यांनी पारनेर बारचे सदस्य असलेले वकील सोमनाथ गोपाळे यांना पारनेर न्यायालय परिसर आणि जवळे येथील कुकडी सहकारी पतसंस्थेच्या आवारात धमकावून गलिच्छ शिवीगाळ केल्याचा धक्कादायक प्रकार पारनेर तालुक्यात घडला आहे. याबाबत धमकावणार्या आरोपी च्या विरुद्ध ॲड. सोमनाथ गोपाळे यांनी पारनेर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. धमकावणारा आरोपी हा मुंबई पोलिस दलातील निवृत्त पोलिस अधिकारी आहे. या गंभीर घटनेची दखल घेवून पारनेर बार असोशिएशने बैठक बोलावली होती. अशा प्रकारांमुळे वकीलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आल्याने, यावेळी या घटनेचा संघटनेकडून निषेध करण्यात आला. ॲड. गोपाळे यांना धमकावणाऱ्या आरोपीला अटक करण्याची मागणी निवेदनाद्वारे पारनेर पोलिसांकडे केली आहे. पारनेर बारचे संघटनेचे अध्यक्ष मंगेश औटी यांचेकडून पारनेर पोलिस निरीक्षक संतोष खेडकर यांनी यावेळी निवेदन स्विकारूनआरोपीविरुद्ध कडक कारवाई करण्याचे आश्वासन बारच्या शिष्टमंडळाला दिले आहे. यावेळी पारनेर बार संघटनेचे इतर सदस्य मोठ्या संखेने हजर होते.

## आडूळमध्ये शिक्षकांच्या अंतर्गत वादामुळे पालकसभा उधळली

**शालेय व्यवस्थापन समितीची निवड प्रक्रिया तहकूब**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** येथील पीएम श्री जिल्हा परिषद शाळेत शालेय व्यवस्थापन समितीच्या निवडीसाठी गुरुवारी आयोजित पालकसभेत शिक्षकांमधील अंतर्गत वादामुळे गोंधळ उडाला. वातावरण तणावपूर्ण झाल्याने अखेर सभा तहकूब करण्यात आली.

विद्यमान समितीची मुदत संपल्याने नवीन समिती निवडीसाठी सकाळी दहाच्या सुमारास पालकसभेचे आयोजन करण्यात आले होते. सुरुवातीला शांततेत सुरू असलेल्या या बैठकीत दुपारी काही सदस्यांची निवड 'चिठ्ठी टाकून' करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला. यावर काही पालकांनी आक्षेप घेतल्याने सभेत गोंधळ निर्माण झाला. यानंतर शिक्षक व पालकांमध्ये शाब्दिक वाद झाला. जवळपास दोन तास विद्यार्थ्यांसमोरच गोंधळाचे वातावरण निर्माण झाल्याने अखेर सभा तहकूब करण्याचा निर्णय घेण्यात आला.

या प्रकारामुळे शाळेला जत्रेचे स्वरूप आल्याची प्रतिक्रिया ग्रामस्थांनी व्यक्त केली. शिक्षकांतील राजकारणामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होत असल्याची खंतही पालकांनी व्यक्त केली. या प्रकरणाची चौकशी करून जबाबदारांवर कारवाई करावी, अशी मागणी पालक व ग्रामस्थांनी शिक्षण विभागाकडे केली आहे.

# महेंद्र मधुकर वारे कनिष्ठ महाविद्यालयात पुस्तकांचे पुजनाने कार्यक्रमाची सुरुवात

## रेडिओ जॉकी आर.जे प्रा. आदिनाथ अन्नदाते यांची साधला विद्यार्थ्यांशी संवाद



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नमस्कार सकाळचे नऊ वाजले, आपण ऐकत आहात एमएमव्ही रेडिओ स्टेशन केंद्रावर महेंद्र मधुकर वारे कनिष्ठ महाविद्यालयातील रेडिओ जॉकी कार्यक्रम, मी आहे आपल्या सोबत आर. जे आदिनाथ. आकाशवाणीचे आरजे प्रा. आदिनाथ अन्नदाते यांनी रेडिओ जॉकी म्हणजे आरजे कसे व्हाल, त्यासाठी काय करावे, सूत्रसंचालनासाठी काय महत्त्वाचे आहे याचे धडे विद्यार्थ्यांना दिले.

नगर शहरातील माळीवाडा येथील शिशु संगोपन संचालित श्रीकांत पेमराज गुगळे हायस्कूल संलग्न महेंद्र मधुकर वारे कनिष्ठ महाविद्यालयात इयत्ता अकरावी हिंदी पुस्तकातील अभ्यासक्रमात रेडिओ जॉकी पाठ आहे. या पाठच्या पार्श्वभूमीवर रेडिओ जॉकी क्षेत्रात विद्यार्थ्यांनी कसे अरिअर करावे यासाठी रेडिओ क्षेत्र व्यवसाय मार्गदर्शन कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिशु संगोप संस्थेचे अध्यक्ष दिलीप गुंदेचा होते. प्रमुख पाहुणे म्हणून आकाशवाणी केंद्राच्या निवेदक वर्षा बांगर, संस्थेचे उपाध्यक्ष दशरथ खोसे, सचिव रं.धो. कासवा, सहसचिव राजेश झालानी, संस्थेचे विश्वस्त विनोद कटारिया, प्राचार्य दत्तात्रय कसबे, पर्यवेक्षक प्रा. संजय शेवाळे, परीक्षा प्रमुख प्रा. गणेश पुंड यांच्यासह विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक, कर्मचारीवृंद, विद्यार्थीमोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रा. अन्नदाते पुढे म्हणाले की, तुम्ही आरजे होऊ शकता मात्र त्यासाठी मोठे परिश्रम घ्यावे लागतील. आवाज, भाषा, शब्द आणि सामाजिक, ऐतिहासिक, शैक्षणिकसह विविध विषयाची ज्ञान तुमच्याकडे पाहिजे.

खेळाडू, संगीत कार्यक्रम, देशभक्त यांचे कार्यक्रम असल्यास त्याची पूर्ण माहिती असणे गरजेची आहे. आवाज चांगला असल्यास कार्यक्रम चांगला होतो. ओम कार आणि र कार यामुळे आवाजासाठी चांगला फायदा होतो असे सांगून त्यांना प्रात्यक्षिक करून दाखविले. अनेक पुस्तके वाचा, सकाळी आकाशवाणीतील विविध कार्यक्रम ऐका माहिती उपयोगी पडेल. भविष्यात चांगले सूत्रसंचालक व्हायचे असेल तर इतिहास, ऐतिहासिक, प्रवास वर्णन अनेक पुस्तके वाचा तुम्ही नक्कीच रेडिओ जॉकी व्हाल, चांगले सूत्रसंचालक बनू शकता. एआयमुळे सूत्रसंचालन करण्यासाठी फायदा होणार आहे असे प्रा. अन्नदाते यांनी सांगितले.

निवेदक बांगर यांनी अनेक क्षेत्रात मुलांना करिअर करता येते. एआय तंत्रज्ञानामुळे पुढे अनेक मोठे चांगले बदल होणार आहे. याच काळात तुम्ही तुमचे क्षेत्र निवडा. तुमच्याकडे बोलण्याची कला असेल तर आरजे व्हा असे आवाहन त्यांनी केले. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष खोसे म्हणाले की, वाचानाची आवड, आवाजाच चढ-उतार, भाषा कौशल्य, विविध विषयाचे ज्ञान असल्यास तुम्ही आरजे होऊ शकता. चांगले आरजेची आवश्यता अनेक रेडिओ केंद्रात आहे. चांगले रेडिओ जॉकी त्या केंद्राचे कार्यक्रम लोकप्रिय होतात. त्याचे यश हे आरजेचे असते. सध्याच्या युगात तुम्हाला चांगले बोलता येणे हे महत्वाचे आहे. पुढे साहेब झाल्यानंतर तुम्हाला बोलावे लागणार असल्याने आताच बोलण्याची कला शिका असे आवाहन त्यांनी केले. यावेळी संस्थेचे झालानी यांनी मोबाईलचा वापर कसा करावा, अभ्यासासाठी त्याचा फायदा कसा घ्यावा असे सांगून रेडिओ क्षेत्रात विद्यार्थ्यांना रोजगारांच्या अनेक संधी असल्याचे सांगितले. प्रास्तविकात प्राचार्य कसबे यांनी महाविद्यालयातील गुणवत्तेची माहिती दिली. तसेच विद्यार्थ्यांच्या भविष्याठी विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. ११ वीच्या हिंदी अभ्यासक्रमा रेडिओ जॉकी पाठ आहे. त्या आधारावर रेडिओ जॉकी आपल्या महाविद्यालयात दाखल झाले आहेत. रेडिओ जॉकी म्हणजेच आरजे आकाशवाणीचे प्रा. अन्नदाते आणि बांगर मॅडम या आपल्याला आरजे तुम्ही कस होवू शकता याचे मंत्र ते देणार असल्याचे ते म्हणाले. सूत्रसंचालन प्रा. सुभाष चिंधे यांनी केले आभार पर्यवेक्षक प्रा. संजय शेवाळे यांनी मानले.

# 'पासवर्ड वाचन' अभियान, विद्यार्थ्यांसाठी नवसंजीवनी - आनंद भंडारी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** जिल्हा परिषद अहिल्यानगर व शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरियल फाउंडेशन आणि युनिक फीचर्स, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित,'' पासवर्ड वाचन अभियान '' कार्यक्रमात आशा एज्युकेशन फाउंडेशन संचलित जय बजरंग प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पाईपलाईन रोड, अहिल्यानगर येथे प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी मा.श्री.आनंद भंडारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना श्री.भंडारी म्हणाले की, आजच्या युगात विद्यार्थी मोबाईलवर रिल्स, गेम्स आणि टेलिव्हिजन कार्यक्रमांमध्ये अधिक वेळ घालवत आहेत. त्यामुळे वाचन संस्कृती कमी होत चालली आहे. अशा परिस्थितीत युनिक फीचर्स, पुणे यांनी सुरू केलेले 'पासवर्ड वाचन अभियान' विद्यार्थ्यांसाठी नवसंजीवनी ठरणार आहे.

विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व समजावून सांगताना त्यांनी स्वतःच्या अनुभवातून समृद्ध वाचनामुळे आयुष्यात यशस्वी होण्यासाठी कशी मदत होते हेही स्पष्ट केले. तसेच शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरियल फाउंडेशन आणि आशा एज्युकेशन फाउंडेशनचे अध्यक्ष मा.श्री. नरेंद्रजी फिरोदिया सर यांचे अहिल्यानगर शहरातील विविध सामाजिक कार्यक्रमासाठी ,उपक्रमासाठी आजतागायत दिलेल्या सहकार्याबद्दल आणि योगदानाबद्दल विशेष आभार व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात श्री. नरेंद्रजी फिरोदिया यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत करून या उपक्रमाचे तसेच सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी यासाठी संस्थेकडून नेहमीच सहकार्य राहील, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी जिल्हा परिषद अहिल्यानगर (प्राथमिक विभाग) चे शिक्षणाधिकारी मा.श्री. भास्कर पाटील साहेब यांनीही विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड आणि आत्मविश्वास वाढावा यासाठी निवडलेल्या शाळांना वेळोवेळी भेट देऊन गुणवत्तावाढीसाठी युनिक फीचर्स संस्थेला सर्वतोपरी सहकार्य करू, असे सांगितले.

कार्यक्रमात युनिक फीचर्सचे श्री.आनंद अवधानी यांनी आपले मनोगत व्यक्त करत पासवर्ड वाचन अभियानाच्या तिसऱ्या टप्प्यापर्यंत सहकार्य करणाऱ्या सर्व मान्यवरांचे आभार मानले. तसेच त्यांनी आपल्या सोबतच्या सहकारी कलाकारांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना ''वाचन हा यशाचा गुपित मार्ग म्हणजे पासवर्ड वाचन'' हा संदेश समजावून सांगितला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाच्या प्राचार्या सौ. संगीता पाठक यांनी केले, तर सर्व मान्यवरांचा सत्कार मुख्याध्यापक श्री.अमोल क्षीरसागर यांनी केले. कार्यक्रमाचे आभार तपोवन माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. वर्षा कुसकर यांनी मानले.

या कार्यक्रमास संस्थेचे सहसचिव श्री. उमेश गांधी सर, व्यवस्थापक श्री. आशुतोष घाणेकर सर, सहव्यवस्थापक श्री. अमोल तोडकर सर, विस्तार अधिकारी सौ.कोलते मॅडम,विस्तार अधिकारी श्री. शिंदे , युनिक फीचर्स च्या जोगळेकर मॅडम , वसुधा बोरकर मॅडम विषयतज्ज्ञ शिंदे सर, राजेंद्र चव्हाण सर, तसेच शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन - डॉ. ज्ञानेश्वर दराडे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**खरवंडी कासार –** पाथर्डी तालुक्यातील खरवंडी कासार येथे श्रीसंत जनार्धन स्वामी मंदिर येथे रविवार दि ८ मार्च रोजी सकाळी दहा वाजता महीलांची मोफत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न होत आहे निंबादैत्य संस्थान अध्यक्ष डॉ.सुभाष देशमुख संस्थान विश्वस्थ सुभाष दहिफळे यांच्या शुभहस्ते शिबीरास सकाळी १० वाजता प्रारंभ होणार असुन दिवसभर आरोग्य तपासणी सुरु राहणार आहे तज्ञ डॉ. वर्षा कराड, डॉ.संतोष गिते विद्या दराडे, डॉ.श्रीधर कुलकर्णी, डॉ. ज्योती कुलकर्णी, डॉ. सुभाष देशमुख, डॉ. ज्ञानेश्वर दराडे आदी डॉक्टर आरोग्य तपासणी करणार आहेत तरी भगवानगड परिसरातील महीला ऋग्णांनी या मोफत आरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा असे अवाहन देवनाथ फाऊंडेशन प्रमुख डॉ.ज्ञानेश्वर दराडे यांनी केले आहे

# इम्पेरियल चौकातील वैष्णव मित्र मंडळाकडून छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त इम्पेरियल चौकात फुलसौंदर मळा येथील वैष्णव मित्र मंडळाच्या वतीने आकर्षक सजावट करून जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी आयुर्वेदिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष सचिन जगताप हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच माजी प्रथम महापौर भगवान फुलसौंदर यांच्यासह नगरसेविका सुनिता फुलसौंदर, माजी उपमहापौर गणेश भोसले, प्रकाश भागानगरे, संजय चोपडा, सुजाता पडोळे, ज्ञानदेव पांडूळे, विष्णु फुलसौंदर, अवधुत फुलसौंदर, एस.टी.बोरुडे, गोरख पडोळे, प्रकाश इवळे, गोरख बोरुडे, रघुनाथ केदार संजय हजारे, अक्षय शिंगणे,भैय्या फुलसौंदर, अविनाश फुलसौंदर, महेश फुलसौंदर, गणेश फुलसौंदर, राजेंद्र फुलसौंदर, मच्छिंद्र फुलसौंदर, अभिजित खोसे आदींसह वैष्णव मित्र मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्तेआणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमानिमित्त इम्पेरियल चौकात आकर्षक फुलांची सजावट, रोषणाई आणि भगवे ध्वज लावून परिसर शिवमय करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. जय भवानी, जय शिवाजीच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. वैष्णव मित्र मंडळाच्या कार्यकर्त्यांनी कार्यक्रमाचे नियोजन उत्साहपूर्ण वातावरणात केले.

यावेळी बोलताना सचिन जगताप म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना करून न्याय, स्वाभिमान आणि धैर्य यांचे आदर्श राज्य उभारले. त्यांच्या पराक्रमाची गाथा आजही प्रत्येक भारतीयासाठी प्रेरणादायी आहे. समाजातील सर्व घटकांना समान न्याय देण्याचा आदर्श त्यांनी घालून दिला असून त्यांचे कार्य आजच्या पिढीसाठी मार्गदर्शक आहे, असे त्यांनी सांगितले.

जगताप पुढे म्हणाले की, शिवाजी महाराजांचे विचार आणि त्यांची कार्यपद्धती आजच्या तरुण पिढीने आत्मसात करणे गरजेचे आहे. राष्ट्रप्रेम, संघटनशक्ती आणि स्वाभिमान यांचा संदेश त्यांच्या जीवनातून मिळतो. समाजात ऐक्य आणि देशभक्तीची भावना वाढवण्यासाठी शिवरायांचे विचार प्रत्येक घरापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे, असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी माजी प्रथम महापौर भगवान फुलसौंदर यांनीही आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवन हे शौर्य, पराक्रम आणि दूरदृष्टीचे प्रतीक आहे. त्यांनी रयतेसाठी उभारलेले स्वराज्य आजही आदर्श मानले जाते. त्यांच्या कार्यातून समाजाला स्वाभिमानाने जगण्याची प्रेरणा मिळते, असे त्यांनी सांगितले.


# नाथषष्ठीचा पवित्र क्षण : संतोष कुलकर्णी यांच्या कावडीने भरला 'नाथांचा रांजण'

## संत एकनाथ महाराजांच्या वाड्यात पारंपरिक सोहळा; भाविकांचा जयघोष, 'श्रीखंड्या' रूप मानून कुलकर्णी यांचे पूजन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** येथे नाथषष्ठी उत्सवानिमित्त पारंपरिक 'नाथांचा रांजण भरणे' हा धार्मिक सोहळा मोठ्या भक्तिभावात पार पडला. गोदावरी नदीतून पवित्र जल आणून संत एकनाथ महाराजांच्या वाड्यातील रांजण भरण्याची शतकानुशतकांची परंपरा यंदाही मोठ्या उत्साहात पार पडली.

परंपरेनुसार भगवान श्रीकृष्णाने 'श्रीखंड्या' या रूपात तब्बल १२ वर्षे संत एकनाथ महाराजांच्या सेवेत राहून गोदावरीचे पाणी आणून रांजण भरण्याचे कार्य केले, अशी आख्यायिका सांगितली जाते. त्या स्मृती जागवत दरवर्षी नाथषष्ठीनिमित्त भाविकांच्या घागरीतील गोदावरीच्या पाण्याने हा पवित्र रांजण भरला जातो. यंदा हा रांजण सकाळी ७.५० वाजता संतोष विठ्ठलराव कुलकर्णी (रा. ह.मु. पैठण) यांच्या कावडीतील गोदावरीच्या पाण्याने भरला. रांजण भरताच उपस्थित



भाविकांनी जयघोष करत आनंद व्यक्त केला. ही वार्ता वाऱ्यासारखी शहरात व परिसरात पसरताच नाथ भक्तांनी एकमेकांना आलिंगन देत संत एकनाथ महाराज आणि भगवान श्रीखंड्या यांच्या नावाचा जयघोष केला.

यावेळी ह.भ.प. रघुनाथबुवा नारायणबुवा गोसावी पालखीवाले (नाथवंशज) यांनी संतोष कुलकर्णी यांना 'श्रीखंड्या' अर्थात श्रीकृष्णाचे रूप मानून त्यांचे विधीवत पूजन केले. पारंपरिक धार्मिक विधी आणि भक्तिमय वातावरणात हा सोहळा संपन्न झाला.

दरवर्षीप्रमाणे यंदाही नाथषष्ठीनिमित्त पैठणमध्ये विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. राज्यभरातून हजारो भाविक येथे दाखल झाले असून संत एकनाथ महाराजांच्या वाड्यातील रांजण भरण्याचा सोहळा हा नाथषष्ठी उत्सवातील प्रमुख धार्मिक परंपरांपैकी एक मानला जातो.दरम्यान, रांजणाला सुशोभित चांदीचा पत्रा बसवून त्यातील पाणी कायम शुद्ध राहील अशी व्यवस्था करावी, अशी मागणी वारकरी व नाथ भक्तांनी केली आहे.

नाथ मंदिरात नाथ चरित्र प्रवचन

गावातील नाथ मंदिरात तुकाराम बीजपासून पुरोहित रवींद्र साळजोशी यांचे 'नाथ चरित्र' प्रवचन सुरू असून हे प्रवचन ८ मार्चपर्यंत चालणार आहे. भाविकांच्या सुविधांकडे लक्ष देण्याची मागणी

नाथषष्ठीत सहभागी होण्यासाठी लाखो भाविक पैठणकडे येत असून हजारो भाविक वाहनांनीही शहरात दाखल होत आहेत. दिंड्यांतील भाविकांसाठी अन्नदान व स्वयंपाक करताना गॅस टाक्यांचा काळजीपूर्वक वापर करावा, अशी सूचना करण्यात आली आहे. तसेच सद्य परिस्थिती लक्षात घेता पैठण व परिसरातील पेट्रोल पंपांवर वाहनांना पेट्रोल-डिझेलचा सुरळीत पुरवठा होईल यासाठी जिल्हाधिकारी व तहसील प्रशासनाने उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही करण्यात आली आहे.

## समर्थ विद्या प्रसारक मंडळात 'समर्थ महिला दिन' उत्साहात

# घरातूनच स्त्री-पुरुष समानतेची सुरुवात झाली तरच सशक्त समाज घडेल - डॉ. प्रीती भोंबे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** समर्थ विद्या प्रसारक मंडळाच्या वतीने सांगळे गल्ली येथील श्री समर्थ विद्यामंदिरात 'समर्थ महिला दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास स्नेहालयाच्या मानस सचिव डॉ. प्रीती भोंबे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. संस्थेचे चेअरमन श्रीपाद कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी परिसरातील अंगणवाडी सेविका, सांगळे गल्लीतील प्राथमिक व माध्यमिक विभागातील शिक्षिका तसेच शाळेतील माता-पालकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे चेअरमन श्रीपाद कुलकर्णी, संचालक स्वप्निल कुलकर्णी, संचालक सुनील जोशी, मुख्याध्यापक अजय महाजन यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून बोलताना डॉ. प्रीती भोंबे यांनी प्रथम संस्थेचे आभार मानले. त्या म्हणाल्या की, महिलांनी प्रत्येक वेळेस 'सुपर वुमन' होण्याचा प्रयत्न करण्याची गरज नाही. आयुष्यातील संघर्ष एकट्याने करण्याऐवजी कुटुंबीयांची साथ घेणे तितकेच महत्त्वाचे आहे. महिला सक्षम होण्यासाठी कुटुंब, समाज आणि संस्थांची साथ मिळणे आवश्यक असून महिलांच्या आरोग्याची काळजी घेणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे.

पुढे त्या म्हणाल्या की, यावर्षीच्या महिला दिनाची 'गिव्ह अँड गेन' ही संकल्पना समाजासाठी मार्गदर्शक आहे. घरातूनच स्त्री-पुरुष समानतेची सुरुवात झाली पाहिजे. महिलांचा सन्मान आणि त्यांना समान संधी दिल्यास समाज अधिक सशक्त बनेल. महिला दिन साजरा करताना केवळ महिलांनी नव्हे तर पुरुषांनीही सहभागी होणे गरजेचे आहे. स्त्री-पुरुष समानतेचा विचार समाजाने मनापासून स्वीकारला तरच प्रगतीशील आणि सुदृढ समाजव्यवस्था उभी राहू शकते, असेही त्यांनी सांगितले.

शिशुविहार शाळेच्या सुनीता देव यांनी संस्थेच्या विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. संस्थेचे माध्यमिक विभाग शाळा समितीचे चेअरमन स्वप्निल कुलकर्णी यांनी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सत्कार केला.

अध्यक्षीय समारोपात श्रीपाद कुलकर्णी

(पान १ वरून)

# युद्धजन्य परिस्थितीत शांततेसाठी भारताने पुढाकार घ्यावा - अण्णा हजारे

आणि शांततेची असून भारताने जगासमोर संवाद आणि शांततेचा मार्ग पुढे करावा, असे त्यांनी पत्रात नमूद केले आहे. युद्धामुळे विनाश होतो, तर संवादातूनच स्थैर्य आणि समाधानाचा मार्ग निघतो. त्यामुळे भारताने तटस्थ आणि जबाबदार भूमिका घेत जागतिक स्तरावर शांतता प्रस्थापित करण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा अण्णा हजारे यांनी व्यक्त केली आहे.

आजच्या जगाला शस्त्रांची नव्हे तर विश्वास, सहकार्य आणि संवादाची गरज आहे. युद्धामुळे केवळ विनाश होतो, तर संवादातून समाधान आणि स्थैर्याचा मार्ग निर्माण होऊ शकतो. त्यामुळे भारताने तटस्थ आणि जबाबदार भूमिका घेत जागतिक स्तरावर शांततेला प्रोत्साहन देण्यासाठी मोदींनी पुढाकार घ्यावा, अशी विनंती करण्यात आली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने अनेक जागतिक प्रश्नांवर सकारात्मक भूमिका बजावली आहे. त्यामुळे या संवेदनशील काळात भारताने मानवतेच्या आणि शांततेच्या बाजूने पुढे येत संवाद आणि सहकार्याचा मार्ग मजबूत करावा, अशी अपेक्षाही हजारे यांनी पत्रात म्हटले आहे.

# नाथषष्ठी यात्रेसाठी पैठण बसस्थानक 'डिजिटल' नजरेखाली

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** संत एकनाथ महाराजांच्या नाथषष्ठी यात्रेनिमित्त शहरात येणाऱ्या लाखो भाविकांच्या सोयीसाठी प्रशासनाकडून स्वच्छता, पाणीपुरवठा व सुरक्षेचे व्यापक नियोजन करण्यात आले आहे. नगरपालिकेच्या वतीने शहरात सुमारे ३०० फिरती शौचालये उभारण्यात येणार असून मुख्य रस्ते, मंदिर परिसर व घाट भागात स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे.

यात्रेदरम्यान भाविकांना पिण्याच्या पाण्याची कमतरता भासू नये यासाठी शहरातील विविध ठिकाणी पाण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. तसेच गोदावरी घाट परिसरात स्वच्छतेकडे विशेष लक्ष देण्यात येत असून नदीपात्र स्वच्छ ठेवण्यासाठी उपाययोजना करण्यात येत आहेत.

दरम्यान, प्रवाशांच्या सुरक्षेसाठी पैठण बसस्थानकात १५ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे काम सुरू असून त्यामुळे संपूर्ण परिसर 'डिजिटल' नजरेखाली राहणार आहे. या माध्यमातून चोरी व इतर घटनांवर नियंत्रण ठेवण्यास मदत होणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. नाथषष्ठी यात्रेसाठी प्रशासनाने विविध विभागांच्या समन्वयातून तयारी सुरू केली असून भाविकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात येत आहे.